MHNS030283192020

| | |
|---|---|
| दाखल तारीख | :२२.१२.२०२० |
| नोंदणी तारीख | :२२.१२.२०२० |
| निकाल तारीख | :१२.१०.२०२१ |
| कालावधी | :वर्षे महिने दिवस<br>००   ०९   २० |

**नाशिक येथील मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात**
(पिठासीन अधिकारी एम. एम. गादिया)

**नियमित फौजदारी खटला क्र.१५१४/२०२०**
**नि.२२**

**महाराष्ट्र शासन,**
मार्फत पोलीस निरीक्षक,
गंगापुर पोलीस ठाणे,
नाशिक. ....**अभियोगपक्ष**

***विरूध्द***

१. **रविंद्र देवाजी दुपारे,**
वय : ४३ वर्षे, व्यवसाय : व्यापार.

२. **देवाजी हंसराज दुपारे,**
वय : ६८ वर्षे, व्यवसाय : सेवानिवृत्त.

३. **चंद्रकला देवाजी दुपारे,**
वय : ६५ वर्षे, व्यवसाय : घरकाम.
नं.१ ते ३ रा.बी—४, निसर्ग अपार्टमेंट,
अरिहंत नर्सिंग होम शेजारी,
प्रमोदनगर, गंगापुर रोड, नाशिक.

**४. दर्पण गौतम बलसाणे,**
वय : ४० वर्षे, व्यवसाय : नोकरी.

**५. गौतम गंभीर बलसाणे,**
वय : ५२ वर्षे, व्यवसाय : नोकरी.
नं.४, ५ रा.२०२, ए मधुर मंगल ॲव्हेन्यु,
फेज १, कामगार नगर रोड,
महात्मा नगर, नाशिक. **....आरोपी**

**विधीज्ञ —**
श्री. एफ. एल. शेख, सहायक सरकारी वकील अभियोगपक्षातर्फे
श्रीमती ए. एस. गायकवाड वकील बचावपक्षातर्फे

**न्यायनिर्णय**
**(घोषित दिनांक १२.१०.२०२१)**

प्रस्तुत खटल्यात आरोपी हे भारतीय दंड संहिता, १८६० मधील कलम ४९८—अ, ४९४, ३२३, ५०४, व ५०६[I], सह कलम ३४ खालील गुन्हयांसाठी चौकशीस सामोरे जात आहेत.

**२.**अभियोगपक्षाची हकिकत थोडक्यात अशी की, दिनांक ०६.०८.२०१९ रोजी फिर्यादी नामे सविता रविंद्र दुपारे हिचा आरोपी क्र.१ रविंद्र देवाजी दुपारे याच्यासोबत गंगापुर येथील समाजमंदीरात बौध्द धर्म पध्दतीने विवाह झालेला आहे. फिर्यादीने पहिल्या पतीपासुन घटस्फोट घेवुन आरोपी क्र.१ शी विवाह केलेला आहे. आरोपी क्र.२ नामे देवाजी हंसराज दुपारे, व आरोपी क्र.३ चंद्रकला देवाजी दुपारे हे फिर्यादीचे अनुक्रमे सासरे व सासु आहेत, तर आरोपी क्र.४ दर्पण गौतम बलसाणे ही तीची नणंद आहे, तर आरोपी क्र.५ हा आरोपी क्र.४ चा पती आहे. विवाहानंतर फिर्यादी ही आरोपी क्र.१ ते ३ यांच्यासोबत नाशिक येथील गंगापुर रस्त्यावरील निसर्ग अपार्टमेंटमध्ये राहू लागली. त्यावेळी सुरूवातीचे १०—१५ दिवस आरोपींनी तीस चांगली वागणूक दिली. त्यानंतर आरोपी क्र.२ व

३ हे किरकोळ कारणावरून तीच्याशी वाद घालू लागले, तसेच तीस शिवीगाळ करू लागले. तीच्या आईवडीलांनी विवाहात मानपान दिला नाही, भेटवस्तू व वाहन दिले नाही, असे ते तीस म्हणू लागले. आरोपी क्र.२ व ३ हे तीच्याबद्दल आरोपी क्र.१ यास खोटे नाटे सांगून तीच्याविरूध्द भडकावू लागले. त्यामुळे आरोपी क्र.१ हा तीस वाईट शिवीगाळ करून दमदाटी करू लागला. त्यावेळी आरोपी क्र.१ ने तीस सांगितले की, "त्यास तीच्याशी विवाह करण्यात काही रस नव्हता, व त्याचा पहिला विवाह झालेला आहे, व त्यातून त्यास एक मुलगी जन्मलेली आहे, तसेच त्याची पहिली पत्नी ही तीच्यापेक्षा चांगली आहे." आरोपी क्र.१ तीस काही कामधंदा येत नाही, असेही म्हणू लागला. आरोपी क्र.४ व ५ हेही तीस घरी येवुन किरकोळ कारणावरून अपमानास्पद बोलत असत, व तीस दमदाटी करत असत. आरोपींनी तीस नवीन घर खरेदी करण्यासाठी माहेरून रूपये १०,००,०००/— आणण्याची मागणी केली. त्यावेळी तीच्या आईवडीलांची आर्थिक स्थिती खालावलेली असल्यामुळे, तीने सदर रक्कम माहेरून आणण्यास नकार दिला असता, आरोपी तीस म्हणाले की, "तु आताच्या आता घराबाहेर हो, व तु पैसे घेवून आल्याशिवाय तुझे तोंड दाखवू नकोस." आरोपी क्र.१ ने त्याचा पहिला विवाह जिवंत असल्याचे लपवून, तीच्याशी बेकायदेशीर दुसरा विवाह केला. दिनांक २४.०४.२०२० रोजी आरोपी क्र.२ हिने किरकोळ कारणावरून कुरापत काढून फिर्यादीस वाईट शिवीगाळ केली, तर आरोपी क्र.१ ने तीस लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या अनुषंगाने फिर्यादीने दिनांक २४.०७.२०२० रोजी गंगापुर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. सदर फिर्यादीच्या अनुषंगाने २९१/२०२० या क्रमांकाने गुन्हयाची नोंद करण्यात आली. सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान, आरोपींना अटक करण्यात येवुन, तपासाअंती, त्यांच्याविरूध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

**३**.मी आरोपींविरूध्द दोषारोप(नि.३) तयार केला, व त्यातील मजकुर आरोपींना

त्यांच्या मायबोलीत वाचून व समजावुन सांगितला असता, त्यांनी गुन्हा नाकबूल केला, व चौकशीची मागणी केली. आरोपींनी आपल्या बचावात अभियोगपक्षाची सर्व हकीकत नाकारून, त्यांना खोटया गुन्हयात गोवण्यात आल्याचे नमुद केले आहे.

**४.**वादप्रश्न व त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत,

| **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. आरोपींनी त्यांच्या संगनमताने फिर्यादीस क्रुर वागणुक दिली, असे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | ...नाही. |
| २. आरोपी क्र.१ ने त्याचा पहिला विवाह जिवंत असताना, किंवा घटस्फोट न घेता, फिर्यादीशी बेकायदेशीर दुसरा विवाह केला ? | ...नाही. |
| ३. आरोपींनी त्यांच्या संगनमताने फिर्यादीस ईच्छापुर्वक दुखापत केली, असे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | ...नाही. |
| ४. आरोपींनी त्यांच्या संगनमताने फिर्यादीस अपशब्द वापरले, असे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | ...नाही. |
| ५. आरोपींनी त्यांच्या संगनमताने फिर्यादीस दुखापत करण्याची धमकी दिली, असे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | ...नाही. |
| ६. आदेश काय? | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले आहे. |

## कारणमिमांसा

**५.**दोन्ही बाजूच्या विद्वान वकिलांचे युक्तीवाद ऐकण्यात आले. आपल्या हकिकतीच्या पुष्टयर्थ, अभियोगपक्षाने केवळ फिर्यादीची साक्ष(नि.१४) घेतली आहे. अभियोगपक्षाने दिनांक २४.०७.२०२० रोजीच्या फिर्यादचा(नि.१५) आधार घेतला आहे.

**वादप्रश्न क्र.१ ते ५ करीता,**

**६.**सदर वादप्रश्न हे परस्परांशी निगडीत असल्यामुळे, व विश्लेषणाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एकत्रित विश्लेषीत करण्यात येत आहेत. फिर्यादी व आरोपी यांच्यात वर नमुद नातेसंबंधाबाबत कोणताही वाद नाही. फिर्यादीने आपल्या साक्षीत(नि.१४) असे नमुद केले आहे की, दिनांक ०६.०८.२०१९ रोजी तीचा आरोपी क्र.१ शी झालेल्या विवाहानंतर काही दिवस आरोपी व तीच्या दरम्यानचे सर्व चांगले होते. त्यानंतर आरोपी व तीच्या दरम्यान किरकोळ वाद होवु लागले. सदर कौटुंबिक वादातून रागाचे भरात तीने आरोपींविरूध्द दिनांक २४.०४.२०२० रोजी फिर्याद(नि.१५) गंगापुर पोलीस ठाण्यात दिली होती. फिर्यादमधील मजकुर तीने गैरसमजुतीतून लिहीलेला होता. फिर्यादीने आपल्या सरतपासात अभियोगपक्षास साथ दिलेली नाही, म्हणुन तीचा उलटतपास घेण्यात आला, परंतु त्यातुन अभियोगपक्षास पुरक असे काहीही आलेले नाही. फिर्यादीने आपल्या सदर उलटतपासात असे मान्य केले आहे की, आरोपी व तीचे दरम्यानचा वाद आपआपसात मिटलेला आहे, व ती आरोपी क्र.१ सोबत नांदावयास जात आहे. अभियोगपक्षाने फिर्यादी व्यतिरीक्त इतर कोणत्याही साक्षीदाराची साक्ष घेतलेली नाही.

**७.**फिर्यादीच्या एकंदरीत साक्षीवरून असे दिसते की, तीने आरोपींसोबत किरकोळ वादावरून व गैरसमजुतीतून त्यांच्याविरूध्द फिर्याद(नि.१५) दाखल केली होती. सदर किरकोळ वाद काय होते, याचा कोणताही तपशील तीच्या साक्षीत आलेला

नाही. आरोपी क्र.१ चा पहिला विवाह जिवंत असताना, किंवा घटस्फोट न घेता, त्याने तीच्याशी बेकायदेशीर दुसरा विवाह केला आहे, असे फिर्यादीने आपल्या साक्षीत नमुद केलेले नाही. एकंदरीत, आरोपी क्र.१ ने फिर्यादीशी बेकायदेशीर दुसरा विवाह केला, तसेच सर्व आरोपींनी तीस क्रुर वागणुक दिली, ईच्छापुर्वक दुखापत केली, अपशब्द वापरले, व दुखापत करण्याची धमकी दिली, हे दंड संहितेतील कलम ४९८–अ, ४९४, ३२३, ५०४, व ५०६[I] खालील गुन्हे कोणत्याही प्रकारे सिध्द झालेले नाहीत. म्हणुन वादप्रश्न क्र.१ ते ५ चे निष्कर्ष नकारार्थी असे आहेत.

**वादप्रश्न क्र.६ करीता,**

**८.**मी वादप्रश्न क्र.१ ते ५ ला दिलेल्या नकारार्थी निष्कर्षांचा विचार करता, आरोपी हे निर्दोषमुक्त होण्यास पात्र आहेत. परिणामतः मी वादप्रश्न क्र.६ च्या निष्कर्षादाखल, खालील आदेश पारीत करीत आहे,

## आदेश

**१.**आरोपींना भारतीय दंड संहिता, १८६०, मधील कलम ४९८–अ, ४९४, ३२३, ५०४, व ५०६[I] खालील गुन्हयांतून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, मधील कलम २४८(१) अन्वये निर्दोषमुक्त करण्यात आले आहे.

**२.**आरोपींचे जामीनकदबे रद्द करण्यात आले आहेत, व त्यांना स्वातंत्र्य देण्यात आले आहे.

सही–––

नाशिक.
दिनांक : १२.१०.२०२१.

(एम. एम. गादिया)
अतिरिक्त मुख्यन्यायदंडाधिकारी,
नाशिक